# प्रेस नोट

## पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई.

## ४७ वी कोंकण परिक्षेत्रीय वार्षिक पोलीस क्रिडा स्पर्धा २०२२

४७ वी कोंकण परिक्षेत्रीय वार्षिक पोलीस क्रिडा स्पर्धा-२०२२ पोलीस मुख्यालय,कळंबोली, नवी मुंबई येथे दिनांक ०९/१२/२०२२ ते १४/१२/२०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये कोंकण परिक्षेत्रातील नवी मुंबई, ठाणे ग्रामीण, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर असे ०६ जिल्हांचे संघ सहभागी झाले आहेत. आज दिनांक ०९/१२/२०२२ रोजी ४७ वी कोंकण परिक्षेत्रीय वार्षिक पोलीस क्रिडा स्पर्धा २०२२ चे उद्घाटन सकाळी ०७:०० वा. मा. सहा. पोलीस आयुक्त, प्रशासन, नवी मुंबई यांचे हस्ते करण्यात आले आहे.

दिनांक ०९/१२/२०२२ रोजी झालेल्या सामन्यांमध्ये खो-खो क्रिडा स्पर्धेमध्ये पुरुष गटात रायगड, नवी मुंबई, सिंधुदुर्ग व महिला गटात रायगड, सिंधुदुर्ग या संघानी विजय मिळविलेला आहे. तसेच व्हॉलीबॉल या क्रिडा प्रकारात महिला गटात रायगड, सिंधुदुर्ग व नवी मुंबई हे संघ विजयी झाले आहेत. हॉकी खेळामध्ये नवी मुंबई, रायगड व ठाणे ग्रामीण संघ विजयी झाले आहेत. फुटबॉल खेळामध्ये नवी मुंबई व रायगड या संघानी विजय मिळविलेला आहे. कुस्ती पुरुष क्रिडा प्रकारात नवी मुंबई व महिला गटात ठाणे ग्रामीण-मिरा भाईदर विजयी झाले आहेत.

वैयक्तिक क्रिडा प्रकारात १०००० मी. धावणे (पुरुष) मणिलाल गावीत, नवी मुंबई तसेच १५०० मी. धावणे (महिला) माधुरी लोखंडे, रायगड यांनी प्रथम क्रमांक पटकविला आहे. गोळाफेक (महिला) तेजस्विनी जाधव, रत्नागिरी यांनी प्रथम क्रमांक मिळविला आहे.

दि.१०/१२/२०२२ रोजी व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, कबड्डी(पुरुष/महिला) व ॲथलेटिक्स वैयक्तिक हे क्रिडा प्रकार खेळविण्यात येणार आहे.

Scanned with CamScanner